**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – राहूल प्रमोद परब

माझे वय – २५ वर्षे,

व्यवसाय – खाजगी नोकरी

रा/ने – कुंभारमाठ मालवण, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग.

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.टी.ए.भणगे यांचे मार्फत.</u>**

०१. दि. ०८/१२/२०२४ रोजी पोलीसांनी मला बोलविले नव्हते. मी घटनास्थळावरुन जात असताना झालेला अपघात मी पाहिला होता. कुठली गाडी येवून कुठल्या गाडीला धडकली व त्यामध्ये कोणाची चुक होती हे मला सांगता येणार नाही. मला अपघातग्रस्त वाहनांचा क्रमांक सांगता येणार नाही. कोणत्या कंपनीचे वाहन होते व कोणत्या दिशेने कोणते वाहन जात होते हे मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझा पोलीस स्टेशनमध्ये जबाब नोंदविलेला नव्हता.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/१२/२०२४ रोजी दुपारी ३.४५ वा. कुंभारमाठ ते वेंगुर्ला जाणाऱ्या सागरी महामार्गावर अपघात झालेला आहे हे मला समजले होते. मला हे सांगता येणार नाही की, सदर दिवशी मारुती सुझूकी कंपनीचा इर्टीगा मॉडेलची गाडी क्र. एमएच–०२–डीएस–११०६ व मारुती सुझूकी कंपनीची इर्टीगा मॉडेलची गाडी क्र. एमएच–४३–एन–७०५० हया दोन्ही गाडयाचा अपघात झाला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, अपघातात झालेल्या जखमींना तात्काळ उपचारासाठी ॲम्ब्यूलन्समध्ये

रुग्णालयात पाठविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, एमएच–०२–डीएस–११०६ या गाडीच्या चालक सिध्देश महेश पवार याने रस्त्याच्या विशिष्ट परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगईने व भरधाव वेगाने गाडी चालवत होता व त्यांच्यामुळे अपघात झाला होता असे माझ्या निदर्शनास आले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे टिप्पण माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. आरोपीस दाखविल्यास मी आरोपीला ओळखू शकणार नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.पई यांचे मार्फत.</u>**

उलट तपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : ०५/०५/२०२५

मोहम्मद कैसर फकीह
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण